# माता बाल संगोपन कार्यक्रम

**१) अर्भक मृत्यु प्रमाण** ( Infant Mortality Rate)

$$\text{अर्भक मृत्यु प्रमाण} = \frac{\text{१ ते ५ वर्ष वयोगटातील एकुण बालकाचे मृत्यु}}{\text{एकुण जिवंत जन्म}} \times \text{१०००}$$

उदा **वर्ष १९९९ मधील अर्भक मृंत्युची संख्या ८३ एकुण जिवंत जन्म १६८४**

$$\text{जन्मदर} = \frac{\text{८३}}{\text{१६८४}} \times \text{१०००} = \text{४९}$$

**अर्भक मृत्यु :-** बाळाच्या जन्मापासुन १ वर्षाच्यात जर त्याचा मृत्यु झाला तर त्या मृत्युस अर्भक मुत्यु म्हणतात. किंवा एखादे बाळ त्याचा १ ला वाढदिवस होण्यापुवी दगावले तर त्याला अर्भक मृत्यु म्हणतात.

**२) परिप्रसव अर्भक मृत्युप्रमाण** (Perinatal Mortality )

$$\text{परिप्रसव अर्भक मृत्युप्रमाण} = \frac{\text{जिवंत जन्मानंतर ७ दिवसाचे आत झालेले बालमृत्यु} + \text{उपजत मृत्यु}}{\text{एकुण जिवंत जन्म} + \text{उपजत मृत्यु}} \times \text{१०००}$$

**३) नवजात अर्भक मृत्यु प्रमाण** ( Neonatal mortality death)

$$\text{नवजात अर्भक मुत्यु प्रमाण} = \frac{\text{जिवंत जन्मानंतर २८ दिवस वयाचे आत झालेले बाळांचे मृत्यु}}{\text{एकूण जिवंत जन्म}} \times \text{१०००}$$

जन्माला आल्यापासुन २८ दिवसाच्या पुवी होणाऱ्या मृत्युला नवजात अर्भक मृत्यु म्हणतात.

**४) नवजातोत्तर अर्भक मृत्युप्रमाण** ( Post natal mortality death)

$$\text{नवजातोत्तर अर्भक मृत्युप्रमाण} = \frac{\text{२८ दिवस ते १वर्ष (परंतु १ वर्षाच्या आतील मृत्यु}}{\text{उपजत मुत्यु} + \text{एकुण जीवंत जन्म}} \times \text{१०००}$$

२८ दिवसापासुन १ वर्षातर्यतच्या वयात होणारे मृत्युना नवजाताात्तर अर्भक मृत्यु म्हणतात.

**५ ) परिप्रसव अर्भक मुत्यु प्रमाण** ( Pri natal mortality death)

$$\text{परिप्रसव अर्भक मुत्यु प्रमाण} = \frac{\text{उपजत मुत्यु} + \text{जीवंत जन्मानंतर सात दिवसाचे आत झालेले मुत्यु}}{\text{उपजत मुत्यु} + \text{एकुण जीवंत जन्म}} \times 1000$$

**६) उपजत मृत्यु प्रमाण** ( Still birth )

$$\text{उपजत मृत्यु प्रमाण} = \frac{\text{एकूण उपजत मृत्युंची संख्या}}{\text{एकूण जिवंत जन्म} + \text{उपजत मृत्यु}} \times \text{१०००}$$

**७) माता मृत्यु प्रमाण** (Maternal Death)

मातुत्वाच्या निगडीत असलेल्या कारणामुळे प्रसुतीपुर्व काळात, प्रसुतीचे वेळेस अथवा प्रसुतीनंतर ४२ दिवसाचे आत झालेले एकुण मातांचे मुत्यु

**माता मृत्यु प्रमाण =** ------------------------------------------------------------ x १०००

एकूण जिवंत जन्म **+ उपजत मृत्यु**

**माता मृत्युः-** कोणत्याही स्त्रीचा मृत्यु गरोदर झालेनंतर मातृत्वाच्या निगडीत असलेल्या कारणामुळे पसुतीपुर्व काळात, पसुतीचेवेळी अथवा पसुती नंतर ४२ दिवसाचे आत झालेल्या मृत्युस माता मृत्यु म्हणतात.

**८) बाल मृत्यु दर** ( Child death )

वयाचे ० ते ५ वर्षाचे आतील मृत्यु

बाल **मृत्यु प्रमाण =** ------------------------------------------ x १०००

एकूण जिवंत जन्म